# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
# शिक्षण मंडळ, पुणे-४११ ००४

परिपत्रक क्रमांक रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९ वी ते इ.१२ वी/पुर्नपरीक्षार्थी लेखी व तोंडी परीक्षा/प्रात्यक्षिक परीक्षा/अंतर्गत मूल्यमापन/५५०१ दिनांक०८/११/२०१९

संदर्भः-१) शासननिर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र./(२४३/१९)/एसडी-४, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२, दि.०८ ऑगस्ट, २०१९

२) परिपत्रक क्र.रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९वी व इ.१० वीची विषय योजना व सुधारित मूल्यमापन योजना/४२४०/ दि.१६ ऑगस्ट, २०१९

३) परिपत्रक क्र.रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.११वीची विषय योजना व सुधारित मूल्यमापन योजना/४२४१/दि.१६ ऑगस्ट, २०१९

४) शासन पत्र क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.११/एस.डी.२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग/ मंत्रालय, मुंबई-३२, दि.२१ ऑगस्ट, २०१९

५) परिपत्रक क्र.रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९वी व इ.१०वी मूल्यमापन आराखडा /वेबसाईट /५१८१/ दि.१४ ऑक्टो, २०१९

विषयः- इ.९ वी ते इ.१२ वीच्या पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या लेखी/ तोंडी/ प्रात्यक्षिक/अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षेबाबत

या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा यांना कळविण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयानुसार इ.९वी व इ.१० वीच्या सुधारित मूल्यमापन योजनेची अमलबजावणी सन २०१९-२० पासून सुरू झालेली आहे. तसेच इ.११ वीचे सर्व विषय व इ.१२ वीच्या PCMB गट (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित आणि संख्याशास्त्र,विज्ञान व कला शाखा) या विषयांच्या सुधारित मूल्यमापन योजनेची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून सुरु करण्यात आलेली आहे.

सन २०१९-२० च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या पुर्नपरिक्षार्थी विद्यार्थ्यांना नियमित विद्यार्थ्याप्रमाणे उपरोक्त प्रमाणे सुधारित मूल्यमापन योजनेनुसार लेखी परीक्षा द्यावी लागेल. तसेच पुर्नरचित अभ्यासक्रमानुसार तोंडी/प्रात्याक्षिक/अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा द्यावी लागेल याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी.

इ.९वी व इ.१०वीच्या तसेच इ.११ वी व इ.१२ वीच्या पुर्नरचित अभ्यासक्रमाबाबत व शासन निर्णयाप्रमाणे निश्चित केलेल्या मूल्यमापन योजनेच्या अनुषंगाने मूल्यमापन आराखडा, घटक निहाय गुण विभागणी व लेखी /तोंडी/प्रात्यक्षिक अंतर्गत मूल्यमापन योजना याबाबत उपरोक्त परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच सदर संदर्भीय परिपत्रके मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

उपरोक्तप्रमाणे पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या लेखी व तोंडी/प्रात्यक्षिक/अंतर्गत मूल्यमापन परीक्षेबाबतच्या सूचना सर्व शिक्षक, पालक व सर्व पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ,पुणे-०४

प्रति,
सर्व मान्यता प्राप्त माध्य.व कनिष्ठ महाविद्यालये, सातारा /सांगली/कोल्हापूर.

**उपरोक्त प्रमाणे इ.९ वी ते १२ वीच्या पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या लेखी/तोंडी/प्रात्य./अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षेबाबत आपले स्तरावरुन योग्यती कार्यवाही करण्यात यावी.**

**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर**